# मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई
## शनिवार दिनांक ०३/०१/२००३ रोजी झालेल्या ८५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ८५ वी बैठक शुक्रवार दि.०३/०१/२००३ रोजी दुपारी ३.०० वाजता गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृह येथे संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.आमदार श्री.सचिन भाऊ अहिर | सभापती |
| २. | श्री.एस्.एस्.झेंडे | मुख्य अधिकारी |
| ३. | मा.श्री.सचिन मा.सावंत | सदस्य |
| ४. | मा.श्री.विश्वास मोकाशी, | सदस्य |
| ५. | मा.श्री.गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ६. | मा. श्री. रघुनाथ थवई | सदस्य |
| ७. | मा. श्रीमती छाया कल्याणी | सदस्या |
| ८. | मा. श्री उस्मान गणी कुरेशी (लालीभाई) | सदस्य |
| ९. | मा.श्री.मोहन देसाई | सदस्य |
| १०. | मा. श्री. संजय शिर्के | सदस्य |
| ११. | प्रमुख अभियंता, म.न.पा. यांचे प्रतिनीधी | निमंत्रक |
| १२. | उपकर निर्धारक व संकलक ह्यांचे प्रतिनिधी | निमंत्रक |

बैठकीच्या सुरुवातीस मा. सभापती व मा.श्री.गजेंद्र लष्करी ह्यांनी असे प्रतिपादन केले की, सन्मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत ह्यांच्या वडीलांचे दि. ०१.०१.२००३ रोजी दुःखद निधन झाले. ते महाराष्ट्र शासनाच्या पोलीस विभागामध्ये वरिष्ठ अधिकारी म्हणून निवृत्त झाले होते. त्यामुळे त्यांनी त्यांना श्रध्दांजली वाहण्याचा प्रस्ताव मांडला. त्यानुसार उपस्थित मंडळाचे सदस्य,अधिकारी व कर्मचारीवर्ग ह्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून त्यांना श्रध्दांजली वाहिली.

तदनंतर मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी ह्यांनी असे प्रतिपादन केले की, सन्मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हे त्यांच्या वडीलांच्या निधनामुळे आजच्या बैठकीस उपस्थित राहू शकत नाहीत तसेच सन्मा. सदस्य श्री. रमेश परब हे धार्मिक कार्यानिमित्त तिरुपती बालाजीच्या दर्शनाला गेले असल्याने तेही आजच्या बैठकीस उपस्थित राहू शकत नाहीत.

बैठकीच्या सुरुवातीस मुख्य अधिकारी ह्यांनी सुचविल्यानुसार मंडळामध्ये नुकत्याच झालेल्या बदल्यांमुळे जे नवीन अधिकारी/कर्मचारी मंडळामध्ये हजर झाले आहेत त्यांनी त्यांची ओळख करुन दिली.

तदूनंतर मा. सभापती ह्यांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्य व अधिकारी/कर्मचारीवर्गाचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात करण्याच्या सूचना सचिवांना दिल्या.

तदूनुसार बैठकीच्या सुरुवातीस मा. श्री. जाधव साहेब, उपसचिव, महाराष्ट्र शासन ह्यांनी ते त्यांच्या पूर्वनियोजित इतर बैठकीमुळे मंडळाच्या आजच्या बैठकीस उपस्थित राहू शकत नसल्याबाबत कळविल्याचे सांगितले व तदूनंतर मा. सभापती, उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी व कर्मचारीवर्गाचे स्वागत करुन बैठकीस प्रारंभ केला.

तद्नंतर मुख्य अधिकारी हयांनी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सन २००२-२००३ चे सुधारित व सन २००३-२००४ चे अंदाजपत्रक मा. सभापती हयांना सादर केले. हया अंदाजपत्रकाच्या अनुषंगाने मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, दरवर्षीप्रमाणे हे प्रस्तावित अंदाजपत्रक मा. सभापती तसेच सर्व सन्मा. सदस्यांच्या माहितीसाठी सादर करण्यात आले असून मंडळाने त्यास मंजूरी दिल्यानंतर हे प्रस्तावित अंदाजपत्रक प्राधिकरणाला सादर केले जाईल व तद्नंतर ते प्राधिकरणामार्फत शासनास सादर केले जाईल. हया प्रस्तावित अंदाजपत्रकाबाबतची संक्षिप्त माहिती मंडळास देण्याबाबत मुख्य अधिकारी हयांनी मुख्य लेखाधिकारी हयांना आदेश दिले.

तदनुसार मुख्य लेखाधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, हे मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे ११ वे अंदाजपत्रक असून सन २००२-२००३ च्या सुधारित अंदाजपत्रकात जमेच्या बाजूत दाखविल्यानुसार रु. २५१८६.१५ लक्ष इतकी रक्कम जमा होणार असून रु. १६६३०.७६ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे सन २००२-२००३ चे सुधारित अंदाजपत्रक हे रु. ८५५५.३९ लक्ष रक्कमेचे शिल्लकी अंदाजपत्रक आहे. हया सुधारित अंदाजपत्रकामध्ये शासनाकडून उपलब्ध होणारे रु.८८ कोटी अनुदान, उपकरापोटी जमा होणारी रक्कम ७९.३४ कोटी व म.न.पा. चे अनुदान रु. २५.०० कोटी म्हणजेच एकूण रुपये १९२.३४ कोटी मंडळास हयावर्षी उपलब्ध होतील असे गृहीत धरण्यात आले आहे. सन २००२-२००३ च्या अंदाजपत्रकातील जमेच्या बाजूमध्ये दर्शविल्यानुसार रु. १४४४६.६७ लक्ष जमा होतील असे अपेक्षित असून हया वर्षामध्ये रु. १६६८५.५१ लक्ष खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे सन २००३-२००४ चे अंदाजपत्रक हे रु. १८३.८४ लक्षते तुटीचे अंजदापजत्रक आहे. ही तूट प्रशासकीय खर्च तसेच जास्तीत जास्त वसुली करुन भरुन काढण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. मुख्य लेखाधिकारी हयांनी तद्नंतर मंडळास हया अंदाजपत्रकास मंजूरी देण्याची विनंती केली जेणेकरुन सदर अंदाजपत्रक प्राधिकरणास मंजूरीसाठी सादर केले जाईल.

मुख्य अधिकारी हयांनी तद्नंतर असे प्रतिपादन केले की,जमेच्या बाजूमध्ये जे १९२ कोटी रुपये दाखविले आहेत त्यामध्ये शासनाकडून मिळणारे अनुदान व म.न.पा.कडून प्राप्त होणारे अनुदान तसेच उपकराची रक्कम ही गेल्या ३ वर्षांपासून प्राप्त झाली नसल्याने हया सर्व रक्कमा हया वर्षात प्राप्त होतील असे गृहीत धरण्यात आले आहे. लेखा पध्दतीनुसार हया बाबी जमेच्या बाजूमध्ये धराव्याच लागतात. मात्र ही सर्व रक्कम हयावर्षी प्राप्त होईलच असे नाही. हया रक्कमा प्राप्त होण्याच्यादृष्टीने प्रशासकीय व राजकीय स्तरावर तगादा लावावा लागणार आहे. त्यामुळे प्रत्यक्षात मंडळाकड किती रक्कम जमा होईल हयाबाबत साशंकता आहे.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने अशी विचारणा केली की, शासनाकडून अंशदानापोटी तसेच म.न.पा. कडून अंशदान व उपकर वसूलीपोटी मंडळास किती रक्कम प्राप्त होणे शिल्लक आहे.

मुख्य लेखाधिकारी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, म.न.पा. कडून अंशदानापोटी रु. २५ कोटी उपकरापोटी चालू वर्षातील व त्यामागील वर्षातील मिळून एकूण रु. ७९.३४ कोटी, शासनाकडून अनुदानापोटी रु.८८ कोटी अशाप्रकारे एकूण रु. १९२.३४ कोटी मंडळास येणे शिल्लक आहे. ही रक्कम हया वर्षात प्राप्त होईल असे गृहीत धरुन अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

मा. सभापती हयांनी तद्नंतर अशी विचारणा केली की, शासनाकडून आतापर्यंत मंडळाला जो निधी प्राप्त झाला आहे तो किती आहे ?

तद्नुसार मुख्य लेखाधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, आतापर्यंत शासनाकडून मंडळास उपकरापोटी रु. ३० कोटी प्राप्त झाले आहेत. अंशदानापोटी रु. २२.८० कोटी शासनाने मंजूर केले आहेत. मात्र अद्याप सदर रक्कम मंडळास प्राप्त झालेली नसून ती लवकरच प्राप्त होईल अशी अपेक्षा आहे. प्राधिकरणाकडून रु. १० कोटी हया वर्षी अनुदानापोटी प्राप्त झालेले आहेत. मंडळाची अंतर्गत जमा रक्कम रु. २० कोटीच्या आसपास आहे. अशाप्रकारे हया वर्षीच्या (२००२-२००३) अंदाजपत्रकातील जमेच्या बाजूमध्ये रु. ८२/- कोटी रक्कम मंडळाकडे जमा होईल अशी अपेक्षा असून त्यामधून हयावर्षीचा खर्च आपण करणार आहोत.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, आपल्या मागील दोन वर्षातील अथक प्रयत्नामुळे शासनाकडून आपण एकदा रु. ३० कोटी व एकदा रु.२२ कोटी प्राप्त करुन घेतलेले आहेत. मात्र म.न.पा. ने अद्याप उपकर वसूलीची रक्कम मंडळाला दिलेली नाही. म.न.पा. कडून मंडळाला अद्याप किती रक्कम येणे बाकी आहे अशी विचारणा मा. सभापती हयांनी केली.

तद्नुषंगाने मुख्य लेखाधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, म.न.पा. ने प्रमाणित केल्यानुसार आतापर्यंत रु.८५ कोटी उपकरापोटी वसूल केले असून अद्याप सदर रक्कम शासनाकडे जमा केलेली नाही.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, शासनाकडून म.न.पा. ला रक्कम येणे बाकी असल्याने ते उपकराची रक्कम शासनाकडे जमा करु शकत नाहीत असे म.न.पा. चे म्हणणे आहे. वास्तविक हा पैसा शासनाचा, म.न.पा.चा किंवा मंडळाचा नसून तो उपकरप्राप्त इमारतीमध्ये राहणा-या गोरगरीब रहिवाशांचा आहे. त्यामुळे हया पैशाची अडवणुक म.न.पा. ने करणे योग्य नाही. हयाबाबत मा. मुख्यमंत्री, म.न.पा. आयुक्त यांच्याबरोबर झालेल्या बैठकीत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य हयांनी उपकराचा पैसा त्वरित शासनाकडे सुपूर्द करण्याचे आदेश म.न.पा. आयुक्त हयांना दिले होते व त्यानुसार म.न.पा. आयुक्तांनी सदर पैसा त्वरित शासनाकडे सुपूर्द करण्याचे मान्यही केले होते. परंतु तदनंतर त्याबाबत काहीच कार्यवाही झालेली नाही.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, त्यांनी म.न.पा. सभागृहापुढे कलम ६६ नुसार हा मुद्दा उपस्थित केला आहे. परंतु अद्याप हा मुददा चर्चेसाठी आलेला नाही. हयाबाबत म.न.पा. कडे खुलासा नसल्याने अद्याप हया मुद्दयाबाबत चर्चा होऊ शकलेली नाही असे वाटते.

मुख्य अधिकारी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य हयांच्याबरोबर झालेल्या बैठकीत असाही सन्माननीय तोडगा काढण्यात आला होता की, प्राधिकरणाला द्यावयाच्या पैशाबाबत शासनाला मधे न घेता म.न.पा. ने परस्पर सदर रक्कम प्राधिकरणाकडे सूपर्द करावी व हया पैशामधून प्राधिकरणाकडून म.न.पा.स देय असलेली रक्कम सुरुवातीस वळती करुन उर्वरित रक्कम प्राधिकरणाकडे सुपूर्द करावी किंवा देय रक्कम प्राधिकरणाकडे सूपूर्द केल्यानंतर म.न.पा. ची रक्कम म.न.पा. ला देण्यात येईल असेही ठरले होते. शासनाने म.न.पा. ला रु. ३५० कोटी देणे बाकी आहे म्हणून प्राधिकरणाची देय रक्कम म.न.पा.ने शासनाकडे जमा न करणे हे म.न.पा. चे धोरण योग्य नाही. हा पैसा शासनाचा किंवा म.न.पा.चा नसून तो गोरगरीब रहिवाशांचा आहे. म्हाड अधिनियम १९७६ च्या तरतुदींनुसार हा पैसा जमा झाल्यापासून त्यांचा आस्थापना खर्च वगळून १५ दिवसाच्या आत शासनाकडे सुपूर्द करणे म.न.पा. वर बंधनकारक आहे.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी तद्नुषंगाने असे सुचविले की, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, म.न.पा. आयुक्त व मंडळाचे संबंधित अधिकारी हयांची संयुक्त बैठक घेऊन हयाबाबत निर्णय घ्यावा.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, म.न.पा. आयुक्त व मंडळाचे संबंधित अधिकारी हयांची संयुक्त बैठक पूर्वीच झालेली असून मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य हयांनी म.न.पा. आयुक्त हयांना स्पष्ट आदेश दिले आहेत की, उपकराची रक्कम त्वरित शासनाकडे जमा करावी व तद्नुसार म.न.पा. आयुक्त हयांनी सदर रक्कम त्वरित शासनाकडे जमा करण्याचे मान्यही केले आहे. परंतु त्याबाबत पुढे कार्यवाही झालेली नाही. हयाबाबत हया बैठकीच्या इतिवृत्तांतानुसार म.न.पा. कडे तगादा लावणे आवश्यक आहे.

वरील सविस्तर चर्चेअंती सन २००२-२००३ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २००३-२००४ चे अंदाजपत्रक मंजूर करुन ते प्राधिकरणास मंजूरीसाठी सादर करण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ८५/६५५**

**सन २००२-२००३ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २००३-२००४ चे अंदाजपत्रक सर्वानुमते मंजूर करुन ते प्राधिकरणाकडे मंजूरीसाठी सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.**

-----------oo-----------------

**बाब क्रमांक : ८५/१**

विषय- **दि. ३०.११.२००२ रोजी संपन्न झालेल्या मंडळाच्या ८४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.**

मुं.इ.दु. व पु. मंडळाच्या दि. ३०.११.२००२ रोजी संपन्न झालेल्या ८४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते ३७ वर सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती मंडळाच्या दि. ३०.११.२००२ रोजी संपन्न झालेल्या ८४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आला.

------------ooo----------

**बाब क्रमांक : ८५/२**

विषय- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातील पुनर्रचित गाळयांचा सेवा आकार वाढविणेबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र. ३९ ते ४५ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सहमुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाने पुनर्रचित केलेल्या इमारतींमध्ये एकूण २३,८२९ गाळे आहेत. हया सर्व पुनर्रचित गाळयांच्या सेवाशुल्कापोटी दरवर्षी प्रतिमाह रु. ११०/- प्रमाणे वसूली संबंधित रहिवाशांकडून केली जाते. हयामध्ये क्षेत्रफळानुसार सेवाशुल्काची आकारणी केलेली नसून ती सर्व कमी/जास्त क्षेत्रफळाच्या तसेच निवासी/अनिवासी गाळयांना रु. ११०/- प्रमाणे आकारणी केलेली आहे. सन १९९४-९५ पासून हया गाळयांच्या सेवाशुल्कात दरवर्षी रु.५/- एवढीच नाममात्र वाढ

करण्यात येत आहे. त्यामुळे मंडळाला गेल्या ३ वर्षात रु. १९ कोटी इतका तोटा झालेला आहे. हयाबाबत लेखा शाखेने बरेचसे आक्षेप घेतलेले आहेत. त्यामुळे हया गाळयांच्या सेवाशुल्कात वाढ करणे अपरिहार्य झाले असून त्यानुसार हा प्रस्ताव मंडळापुढे विचारार्थ व मान्यतेसाठी सादर केलेला आहे. हया प्रस्तावानुसार पुनर्रचित गाळयांच्या क्षेत्रफळाच्या आकारमानानुसार वाढ प्रस्तावित केली असून अनिवासी गाळयांच्या सेवाशुल्कात निवासी गाळयांपेक्षा अधिक वाढ प्रस्तावित केलेली आहे. ही प्रस्तावित वाढ एकदम न करता ती आपण येत्या पुढील ४ वर्षांपर्यंत टप्प्याटप्याने करणार आहोत. ४ वर्षांनुतर मात्र म.न.पा. च्या करात ज्याप्रमाणे वाढ होईल त्याप्रमाणात सेवाशुल्कात आपोआप वाढ केली जाईल तसेच दरम्यानच्या कालावधीमध्ये जर म.न.पा. ने त्यांच्या करात वाढ केली तर ही वाढ देखील त्या त्या वेळी केली जाणार आहे.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने अशी विचारणा केली की, प्रस्तावित सेवाशुल्कातील वाढ करण्याची कारणे काय आहेत? तद्नुषंगाने सहमुख्य अधिकारी हयांनी अस प्रतिपादन केले की, पृ.क्र.४३ वर सादर केल्यानुसार मागील तीन वर्षांमध्ये चालू दुरुस्ती व विशेष दुरुस्ती साठी हया गाळयांवर मंडळाने एकूण रु. २६८४.७१ लक्ष खर्च केला आहे. मात्र हयाच तीन वर्षात हया गाळयांच्या सेवाशुल्कापोटी मंडळाकडे रु. ७९७.१६ लक्ष पैकी रु. ७६२.१६ लक्ष वसूली झालेली आहे. हयामुळे मागील तीन वर्षात मंडळाला एकूण रु. १८८७.५५ लक्ष तोटा झाला आहे व ही परिस्थिती अशीच चालू राहीली तर मंडळास पुढील दरवर्षी रु. ६ ते ७ कोटी तोटा सहन करावा लागणार आहे. हया आर्थिक तोटयामुळे मंडळाच्या इतर कामकाजावरही परिणाम होण्याची शक्यता आहे. आज आपण म.न.पा. ला जे कर भरीत आहोत ते मंडळाला प्राप्त होणा-या सेवाशुल्कापेक्षा २३७ टक्के अधिक आहेत.

मा. सभापती हयांनी तद्नंतर अशी विचारणा केली की, प्रस्तावित वाढीनुसार आपण किती वाढ करणार आहोत. तद्नुषंगाने सहमुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, प्रस्तावात सादर केल्यानुसार पुढील ४ वर्षांपर्यंत दरवर्षी आपण २५ ते ५५ टक्के वाढ करणार आहोत. हयामध्ये १२० चौ.फू. क्षेत्रफळांचया सामाईक सुविधायुक्त गाळयांपोटी दरवर्षी १५ टक्के, १६० चौ.फू. क्षेत्रफळाच्या सामाईक सुविधायुक्त गाळयांपोटी दरवर्षी २५ टक्के, १८० चौ.फू. क्षेत्रफळाच्या सुविधायुक्त गाळयांपोटी ३० टक्के व सुविधायुक्त १८० चौ.फू. क्षेत्रफळापेक्षा अधिक क्षेत्रफळाच्या अनिवासी गाळयांपोटी दरवर्षी ५५ टक्के वाढ प्रस्तावित केलेली आहे. हयामध्ये अनिवासी गाळयांपोटी अधिक प्रमाणात वाढ प्रस्तावित केलेली आहे. अनिवासी गाळे हे व्यापार तत्वावर असल्याने त्यांच्यावर हया वाढीचा फरक पडणार नाही असे वाटते. मात्र निवासी गाळयांपोटी दरवर्षी १५ टक्के ते ३० टक्के वाढ प्रस्तावित केलेली आहे. त्यानुसार निवासी गाळयांपोटी दरवर्षी रु.१७, रु. २७ व रु. ३३ प्रतिमाह इतकी वाढ प्रस्तावित केलेली आहे. अनिवासी गाळयांपोटी मात्र दरवर्षी रु. ६० प्रतिमाह इतकी वाढ प्रस्तावित केलेली आहे.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तद्नंतर अशी विचारणा केली की, मंडळाचा आतापर्यंत जो रु. १८.८७ कोटी तोटा झालेला आहे तो संपूर्ण तोटा भरुन काढण्यासाठी प्रस्तावित वाढीनुसार मंडळाला किती कालावधी लागणार आहे? तद्नुषंगाने सहमुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, प्रस्तावित वाढीनुसार ही तूट पुढील ४ वर्षात भरुन निघेल.

मुख्य अधिकारी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, पृ.क्र.४५ वर सादर केलेल्या गणनेनुसार पुढील ४ वर्षांपर्यंत आपण मंडळाची आतापर्यंत झालेली तूट भरुन काढून नंतर मात्र आपण जेवढा खर्च करु

तेवढया रक्कमेची वसूली सेवाशुल्कातून करु शकणार आहोत. मात्र दरम्यानच्या काळात जर म.न.पा. ने त्यांच्या करात वाढ केली तर त्यावेळी अशा सुधारित वाढीनुसार सेवाशुल्कात वाढ केली जाईल.

मुख्य अधिकारी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, साधारणपणे ३२८ ते ३३० मंडळाने पुनर्रचित केलेल्या इमारतींमध्ये २३८२९ गाळे आहेत. शासनाने कायद्यात बदल करुन असा निर्णय घेतला आहे की, हया सर्व पुनर्रचित इमारती त्यामध्ये राहणा-या रहिवाशांच्या स.गृ.नि.संस्था स्थापन करुन अशा स.गृ.नि.संस्थांच्या ताब्यात द्याव्यात. हयाबाबत प्रशासकीयदृष्टया प्राधिकरण स्तरावर हया इमारती रहिवाशांच्या स.गृ.नि.संस्थांच्या ताब्यात देण्याबाबतही मागील २ वर्षापूर्वी बरेच प्रयत्न करण्यात आले आहेत. हयाबाबत प्राधिकरण तसेच विशेष करुन मा. अध्यक्ष/प्राधिकरण हयांच्याकडे २-३ वेळा बैठका झाल्या आहेत. हया बैठकीस मा. सभापतीही काहीवेळा उपस्थित होते. हया बैठकीमध्ये असे मत प्रदर्शित करण्यात आले की, अशा इमारतीतील रहिवाशांच्या स.गृ.नि.संस्था अकार्यक्षम होण्याची शक्यता आहे. शेवटी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य हयांच्या स्तरावरही हयाबाबत बैठक झाली. सदर बैठकीमध्येही असे मत प्रदर्शित करण्यात आले की, अशा इमारतीतील रहिवाशांच्या स.गृ.नि.संस्था स्थापन केल्या तर त्या अकार्यक्षम होतील. त्यामुळे अशा स.गृ.नि.संस्था स्थापन करणे योग्य होणार नाही. त्यामुळे हया बैठकीत मुख्य अधिकारी हयांनी असे सुचविले होते की, रहिवाशांच्या स.गृ.नि.संस्थाना हया इमारती ताब्यात न देण्यास हरकत नाही. मात्र हया इमारतींवर दरवर्षी मंडळाचा ६ ते ७ कोटी रुपयांचा आर्थिक तोटा होत आहे. त्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य हयांनी अशी सूचना केली होती की, हया इमारतीतील गाळयांच्या सेवाशुल्कात वाढ करावी जेणेकरुन त्यामध्ये मंडळाचा आर्थिक तोटा भरुन काढून जेवढा खर्च मंडळातर्फे केला जातो तेवढी रक्कम सेवाशुल्कापोटी वसूल करावी. हयास उपस्थित सर्व मान्यवर व अधिका-यांनी संमती दिली आहे तसेच हया बैठकीत असेही ठरले आहे की, सेवाशुल्कात करावयाची वाढ ही एकदम न करता झोपडपट्टी पुनर्विकास योजनेंतर्गत बांधल्या जाणा-या गाळयांच्या बाबतीत ज्याप्रमाणे टप्प्याटप्प्याने वाढ केली जात जाते त्याचप्रमाणे टप्प्याटप्प्याने वाढ करावी. त्यामुळे आपण जी वाढ प्रस्तावित केली आहे त्यानुसार सर्व गाळयांसाठी एकाच प्रमाणात वाढ न करता ती गाळयांच्या क्षेत्रफळाच्या आकारमानानुसार गणना करुन प्रस्तावित करण्यात आली आहे. हया प्रस्तावित वाढीनुसार सन २००६ पर्यंत आपण हया गाळयांवर जितका खर्च करणार आहोत तेवढी रक्कम सेवाशुल्कापोटी टप्प्याटप्प्याने आपण वसूल करु शकणार आहोत. मंडळाकडे उपलब्ध होत असलेला निधी हा तुटपूंजा असल्याने मंडळाची कामे योग्य रितीने पार पाडण्यासाठी प्रस्तावित सेवाशुल्क वाढ अपरिहार्य आहे तसेच हया इमारींवर तूटीच्या खर्चाची जबाबदारी मंडळाने केव्हापर्यंत घ्यावी हा देखील एक मोठा प्रश्न आहे. त्यामुळे दरवर्षी एकटया मंडळाने हया तूटीचा भार पेलण्यापेक्षा हा भार दरवर्षी संबंधित रहिवाशांनी रु. १७/-, २७/-, ३३/- (निवासी गाळयांपोटी) व रु. ६०/- (अनिवासी गाळयांपोटी) प्रतिमाह प्रमाणे पेलण्यास काहीच हरकत नाही. म.न.पा. च्या करात दिवसेंदिवस वाढच होत आहे. त्यामुळे एक वेळ अशी येईल की, मंडळाला उपलब्ध होणारा सर्व निधी हया पुनर्रचित इमारतींच्या गाळयापोटी आकारल्या जाणा-या म.न.पा.च्या करापोटी व देखभालीपोटीच खर्च करावा लागेल.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तद्नुषंगाने अशी विचारणा केली की, पृ.क्र.४३ वर नमूद केल्यानुसार सेवाशुल्क आकारणीपेक्षा खर्चात झालेल्या वाढीची जी टक्केवारी नमूद केली आहे त्यानुसार सन १९९९-२००० मध्ये वाढीच्या खर्चाची टक्केवारी २८८ टक्के, सन २०००-२००१ मध्ये ती २९८ टक्के आहे. मात्र सन २००१-२००२ मध्ये ही टक्केवारी १४५.८९ टक्के इतकी कमी झालेली आहे. त्यामुळे सन २००१-२००२ मध्ये

खर्चाच्या वाढीची टक्केवारी एकदम कमी होण्याची कारणे काय आहेत अशी विचारणा मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी केली.

तद्नुषंगाने सहमुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, वस्तुतः खर्चाच्या वाढीमध्ये कपात झालेली असून हया कालावधीत हया पुनर्रचित गाळयांच्या विशेष दुरुस्तीसाठी जो खर्च झाला आहे तो मार्च २००२ पर्यंतच पकडण्यात आलेला आहे. हया खर्चामध्ये मार्च २००२ पूर्वी कामे होऊनही त्यांची देयके मार्च २००२ पर्यंत मंडळ करु न शकल्याने असा खर्च अंतर्भूत नाही. वास्तविकतः कामे मार्च २००२ पूर्वी होऊनही त्यांची देयके जून ते जूलै २००२ मध्ये अदा केली गेली आहेत. त्यामुळे खर्चाची टक्केवारी प्रत्यक्षात कमी दिसत असली तरी सर्वसाधारणपणे ती मागील दोन वर्षाप्रमाणेच आहे.

मुख्य अधिकारी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, दरवर्षी मंडळ हया पुनर्रचित गाळयांपोटी रु. १२ कोटी म.न.पा.ला करापोटी भरावे लागतात. मात्र सेवाशुल्कापोटी मंडळाला फक्त ४.५० ते ५.०० कोटी रुपये उपलब्ध होतात. त्यामुळे आजमितीस मंडळ जवळजवळ ६० टक्के अधिक रक्कम करापोटी म.न.पा.ला भरीत आहे.

मा. सभापती हयांनी तद्नंतर असे प्रतिपादन केले की, अनिवासी गाळयांपोटी जी ५५ टक्के वाढ प्रस्तावित केली आहे, त्याबाबत अनिवासी गाळेधारकांचे असे म्हणणे असते की, त्यांचा साफसफाई व व काही अंशी पाण्याबाबत संबंध नसतो. त्यामुळे इतक्या मोठया प्रमाणात वाढ करणे संयुक्तिक नाही.

सहमुख्य अधिकारी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, अनिवासी गाळेधारक हे आर्थिकदृष्टया निवासी गाळेधारकांपेक्षा सक्षम वर्गात मोडतात. त्यामुळे अनिवासी गाळेधारकांच्या बाबतीत जर अधिक प्रमाणात वाढ केली नाही तर त्याचा भार निवासी गाळेधारकांवर पडेल. अनिवासी गाळेधारकांकडून आपण दुप्पट भाडे वसूल करीत असतो त्यानुसार अनिवासी गाळेधारकांबाबत प्रस्तावित वाढ ही सुध्दा जवळजवळ दुप्पट आहे.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे मत प्रदर्शित केले की, अनिवासी गाळेधारकांबाबत जी एकदम ५५ टक्के वाढ प्रस्तावित केली आहे, त्याबाबत आपण एकदम ५५ टक्के वाढ न करता ती कमीतकमी प्रमाणात कशी करता येईल यादृष्टीने विचार करणे आवश्यक आहे.

मा. सदस्य, श्री. विश्वास मोकाशी हयांनी तद्नुषंगाने मा. सभापती हयांच्या वरील मतास सहमती दर्शवून अशी विचारणा केली की, सद्यः आपण अनिवासी गाळयांपोटी सेवाशुल्काची जी रक्कम वसूल करतो ती निवासी गाळयांच्या सेवाशुल्कापोटी वसूल केल्या जाणा-या रक्कमेच्या किती प्रमाणात आहे. तद्नुषंगाने सहमुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, एकूण सेवाशुल्कापोटी जमा झालेल्या रु. ८९६ लक्ष पैकी रु. ११५ लक्ष अनिवासी गाळयांपोटी वसूल केलेले आहेत. तद्नुषंगाने मा. सदस्य, श्री. विश्वास मोकाशी हयांनी असे प्रतिपादन केले की, जवळजवळ फक्त १५ टक्के रक्कम ही आपण अनिवासी गाळेधारकांकडून वसूल करीत आहोत. त्यामुळे प्रस्तावित वाढीबाबत हयाचाही विचार होणे आवश्यक आहे.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे मत प्रदर्शित केले की, अनिवासी गाळयांबाबत प्रस्तावित वाढ जी पुढील ४ वर्षात सुचविली आहे ती ४ ऐवजी ५ वर्षात करण्याबाबत विचार होणे आवश्यक आहे. कारण एकदम एवढया मोठया प्रमाणात वाढ केली तर पूर्वानुभवानुसार रहिवाशी सेवाशुल्क भरतील किंवा नाही हयाबाबत शंका वाटते. तसेच एवढया मोठया प्रमाणात वाढ केली तर त्याला राजकीय वळण लागण्याचीही शक्यता आहे. त्यामुळे कमीत कमी प्रमाणात वाढ कशी होईल हयाबाबत विचार होणे आवश्यक वाटते.

मा. सदस्य श्री. सचिन सावंत हयांनी तद्नंतर अशी विचारणा केली की, म.न.पा. तर्फे जो कर आकारला जातो तो निवासी व अनिवासी गाळयांमध्ये किती प्रमाणात लावला जातो. तद्नुसार मा. सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, अनिवासी गाळयाला आकारला जाणारा कर हा निवासी गाळयापेक्षा दुप्पट आकारला जातो.

उपकर निर्धारक व संकलक, म.न.पा. हयांनी अनिवासी गाळयाला लावण्यात येणा-या कराबाबत असे प्रतिपादन केले की, अनिवासी गाळेधारकाने जर पाण्याचे कनेक्शन घेतले असेल तर त्याला लावण्यात येणारा कर २०८ टक्क्यांनी कमी आकारला जातो.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी हयाबाबत अशी विचारणा केली की, हया पुनर्रचित इमारतीत राहणा-या रहिवाशांची संघटना आहे का ? कारण हया प्रस्तावित सेवाशुल्क वाढीला रहिवाशांकडून विरोध होणार हे निश्चित आहे.

मा. सभापती हयांनी तद्नंतर असे प्रतिपादन केले की, ज्यावेळी म.न.पा. तर्फे करात वाढ होईल त्यावेळी त्याप्रमाणात वाढ करण्यापूर्वी त्यास मंडळाची मंजूरी घ्यावी लागेल. कारण त्यावेळी होणारी वाढ प्रचंड झाल्यास त्यास राजकीय वळण लागून भाडेवाढ थांबविण्याचा प्रयत्न केला जाईल.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी असे सुचविले की, प्रस्तावित वाढ ही फक्त ४ वर्षात करण्याऐवजी ती ५ ते ६ वर्षात किंवा किती टप्प्यामध्ये करावी हयाबाबत अभ्यास करणे आवश्यक आहे व त्यानुसार हा प्रस्ताव मंडळाच्या पुढील बैठकीमध्ये फेरसादर करावा. हयास मा. सदस्य श्री. सचिन सावंत हयांनी सहमती दर्शविली.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तद्नंतर असेही सुचविले की, सेवाशुल्कात जर वाढ करावयाचीच ठरले तर प्रस्तावित वाढीच्या ५० टक्के वाढ ही येत्या तीन वर्षात करावी व उर्वरित ५० टक्के वाढीबाबत तद्नंतर विचार करु.

मुख्य अधिकारी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, मा. अध्यक्ष/प्राधिकरण हयांच्याकडे हयाबाबत जेव्हा बैठक झाली तेव्हा मा. अध्यक्ष/प्राधिकरण हयांनी असे परखड मत व्यक्त केले की, प्रस्तावित वाढ ही योग्यवेळी सुचविण्यात आली आहे. त्यामुळे जर ही प्रस्तावित वाढ आता थांबविली तर त्याचा परिणाम मंडळाच्या निधीवर व कामकाजावर होणार आहे.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, सेवाशुल्कातील वाढ न थांबविता सद्यः जी ४ वर्षात वाढ सुचविली आहे ती पूर्णतः न करता ५० टक्के वाढ येत्या दोन वर्षात करावी व उर्वरित ५० टक्के वाढ पुढील दोन वर्षानंतर करण्याबाबत फेरप्रस्ताव सादर करुन करण्यात यावी. कारण ४ वर्षानंतर जी काही एकूण वाढ प्रस्तावित केली आहे ती रहिवाशांना प्रथम समजेल व त्याचे तीव्र पडसाद उमटतील. हयास मा. सदस्य श्री. सचिन सावंत हयांनी सहमती दर्शविली.

मा. सभापती हयांनी तद्नंतर असे प्रतिपादन केले की, जेव्हा सर्वपक्षीय आमदारांच्या बैठकीत हयाबाबत चर्चा होईल तेव्हा रहिवाशांचे प्रतिनिधी हया नात्याने ही वाढ कोणी केली असा प्रश्न त्यांना विचारला जाईल व तद्नंतर त्यास सर्वांमार्फत विरोध केल्यानंतर शासनाकडून ही वाढ थांबविण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो. हे टाळण्याच्यादृष्टीने आपल्याला हया वाढीस मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य हयांची संमती लागणार आहे.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी वरील परिस्थितीत पुन्हा असे सुचविले की, प्रस्तावित ४ टप्प्यांऐवजी सेवाशुल्क वाढ ही फक्त २ टप्प्यांपर्यंतच करावी. उर्वरित २ टप्प्यांतील वाढीबाबत सद्यः विचार न करता तो २ वर्षानंतर करावा.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तद्नंतर असे प्रतिपादन केले की, प्रस्तावित वाढ ही २२५.०० चौ.फू. गाळयांसाठीही लागू करणे आवश्यक आहे.

तद्नुषंगाने मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, २२५.०० चौ.फू. क्षेत्रफळाच्या गाळयांच्या इमारती हया रहिवाशांच्या स.गृ.नि.संस्थांच्या ताब्यात देण्याचे ठरले असल्याने असे गाळे हया प्रस्तावात विचारात घेण्यात आलेले नाहीत.

मा. सभापती हयांनी तद्नंतर असे सूचविले की, सर्व निवासी/अनिवासी गाळयांबाबत सेवाशुल्क वाढ जी टप्प्यात प्रस्तावित केली आहे ती ५ ते ६ टप्प्यापर्यंत करुन कमीतकमी वाढ कशी होईल हयाबाबत विचार होणे आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी तद्नंतर असे प्रतिपादन केले की,सध्या आपण दरवर्षी सेवाशुल्कात फक्त ५ रुपये वाढ करीत आहोत. त्यामुळे प्रस्तावित १५ टक्के ते ५५ टक्के वाढ ही मोठया प्रमाणात आहे. त्यामुळे त्यांनी असे सुचविले की, एवढया मोठया प्रमाणात वाढ न करता ती दरवर्षी ५ टक्क्यांनी करावी. हया पुनर्रचित इमारतीत राहणा-या रहिवाशांची आर्थिक स्थिती हलाखीची आहे. त्यामुळे प्रस्तावित वाढ जर आपण अमलात आणली तर त्यांना सेवाशुल्क भरणे अधिक कठीण होऊन बसेल.

मुख्य अधिकारी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी रहिवाशांबद्दल त्यांच्या ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्या योग्य आहेत. मात्र सद्याच्या म.न.पा.च्या कराचा भरणा करण्यासाठी प्रस्तावित रु. १७/- ते ६०/- प्रतिमाह वाढ ही तसे पाहता वाजवी आहे. मंडळाची आर्थिक स्थिती ढासळू नये. त्यादृष्टीने ब-याच वर्षानंतर प्रस्तावित केलेली ही वाढ माफक आहे. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य हयांनी ही वाढ करण्याच्या सूचना दिल्या असून मा. अध्यक्ष/प्राधिकरण हयांनीही हया प्रस्तावित वाढीस मान्यता दिली आहे. ज्यावेळी हया इमारतीतील रहिवाशांच्या स.गृ.नि.संस्था स्थापन करुन हया इमारती अशा स.गृ.नि.संस्थांच्या ताब्यात देण्याबाबत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य हयांच्याकडे चर्चा झाली त्यावेळी स.गृ.नि.संस्था अकार्यक्षम होतील असे नजरेस आल्यानंतर शासनानेच असे आदेश दिले आहेत की, मंडळाचा आर्थिक तोटा न होण्याच्या दृष्टीने हया इमारतीतील गाळयांच्या सेवाशुल्कात एकदम वाढ न करता ती टप्प्याटप्प्याने करावी.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी तद्नंतर अशी विचारणा केली की, प्रस्तावित वाढीबाबत अशा इमारतीतील रहिवाशांच्या संघटनांशी चर्चा केली आहे काय?

तद्नुषंगाने मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, अशा इमारतीतील संघटनांशी आपण चर्चा केलेली नाही. मात्र पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधलेल्या इमारतीतील रहिवाशांशी हयाबाबत आपण नेहमी बोलत असतो. शेवटी आपण एक रुपयानेही वाढ केली तरी त्यास रहिवाशी विरोध करणारच.

मा. सदस्य श्री. सचिन सावंत हयांनी तद्नंतर असे सुचविले की, मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी सुचविल्यानुसार मंडळाचे आर्थिक नुकसान टाळण्याच्या दृष्टीने प्रस्तावित दोन वर्षातील वाढ ही तीन

टप्प्यांमध्ये करावी. उर्वरित वाढ तद्नंतर दोन टप्प्यांमध्ये करण्याबाबत विचार करु. सद्यः फक्त दोन वर्षातील वाढ तीन टप्प्यामध्ये करुन ती जाहीर करावी.

मा. सदस्या श्रीमती. छाया कल्याणी व इतर सन्मा. सदस्यांनी असे प्रतिपादन केले की, आता जे सेवाशुल्क आकारले जाते ते फक्त ४५ टक्के रहिवाशी मंडळाला जमा करतात. तद्नुषंगाने मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, सद्यः ८५ ते ९० टक्के रहिवाशी सेवाशुल्काचा भरणा मंडळाकडे करीत आहेत. त्यामुळे रहिवाशी सेवाशुल्क मंडळाकडे भरीत नाहीत अशी वस्तुस्थिती नाही.

मा. सभापती हयांनी तद्नंतर असे सूचविले की, एकदम रु. १७ ते रु.६० ने वाढ करण्यापेक्षा ती रु.१० किंवा रु.१२ प्रमाणे पुढील ५-६ वर्षात करावी. १० वर्षापासून आपण वाढ केली नसल्याने ती एकदम ४ वर्षात करणे योग्य होणार नाही. हयास सर्व सन्मा. सदस्यांनी सहमती दर्शविली.

मुख्य अधिकारी हयांनी तद्नंतर मा. सभापती व सर्व सन्मा. सदस्यांना असे सूचविले की, मंडळाची सद्याची आर्थिक परिस्थिती पाहता प्रस्तावित वाढ ही ४ वर्षात न करता ती ५ वर्षात करण्यात यावी.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी तद्नंतर अशी विचारणा केली की, हयापूर्वी मंडळाने कधी सेवाशुल्कात वाढ केली आहे का? तद्नुषंगाने मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाने पूर्वी घेतलेल्या निर्णयानुसार दरवर्षी आपण सेवाशुल्कात ५ रुपये वाढ करीत आहोत. पूर्वी आपल्या हया गाळयांच्या देखभालीपोटीचा खर्च कमी होत होता. आता मात्र हया गाळयांच्या देखभालीच्या खर्चात प्रचंड वाढ झाली असून तो सद्यःच्या सेवाशुल्कातून प्राप्त होणा-या रक्कमेपेक्षा प्रचंड आहे. त्यामुळेच सेवाशुल्कात वाढ करणे अपरिहार्य झाले आहे. हया प्रस्तावास उच्च स्तरावर म्हणजेच मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य हयांच्याकडे झालेल्या बैठकीत मंजूरी दिलेली आहे.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तद्नंतर पुन्हा असे सुचविले की, सेवाशुल्काच्या वाढीस त्यांचा विरोध नसून सद्यः फक्त जानेवारी २००४ पर्यंत दाखविलेल्या वाढीप्रमाणेच वाढ करावी. तद्नंतर दाखविण्यात आलेली वाढ सद्यः विचारात घेऊ नये. हयास मुख्य अधिकारी हयांनी सहमती दर्शवून असे प्रतिपादन केले की, जाने. २००४ नंतर दाखविण्यात आलेल्या वाढीबाबत आपण नंतर विचार करु.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तद्नंतर पुन्हा असे सुचविले की, प्रस्तावित वाढीतील फक्त ५० टक्के वाढ आपण २ ते ३ वर्षात करु या. हया कालावधीमध्ये जर म.न.पा.ने त्यांच्या करात वाढ केली तर अशा वाढीव करांच्या वाढीचा अंतर्भाव हया वाढीत करावा.

मुख्य अधिकारी हयांनी तद्नंतर असे प्रतिपादन केले की, आपणांस हयाबाबत निर्णय घेणे अत्यंत आवश्यक आहे कारण मंडळाची संद्यःची आर्थिक परिस्थिती ही म.न.पा.चे कर भरण्याइतपत नाही.

मा. सभापती हयांनी तद्नंतर असे सूचविले की, हया प्रस्तावाबाबत आपण ४ पर्याय तयार करु या.

१) प्रथम ४ वर्षांची वाढ किमान ६ वर्षात प्रस्तावित करुन त्यानुसार नक्की किती वाढ करावी लागेल हे निश्चित करावे,

२) प्रस्तावित वाढीतील फक्त ५० टक्के वाढ जाने.२००४ पर्यंत केल्यास त्यामध्ये नक्की किती वाढ करावी लागेल,

३) सद्यःच्या सादर केलेल्या प्रस्तावानुसार होणारी वाढ,

४) ज्या ज्या वेळी म.न.पा. तर्फे करात वाढ केली जाईल त्या त्या वेळी मंडळाच्या मंजूरीनंतर अशी वाढ करावी.

पूर्तता :-
सह.मु..अ./उ.
मु.अ. (पु.गा.)

वरीलप्रमाणे प्रस्ताव तयार करुन तो प्राधिकरणाकडे मंजूरीसाठी सादर करावा तसेच हा प्रस्ताव प्राधिकरणास सादर करण्यापूर्वी सन्मा. सदस्यांनी मा.अध्यक्ष/प्राधिकरण हयांच्याबरोबर हयाबाबत चर्चा करावी.

वरील सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते असे ठरले की, मा. सभापती हयांनी प्रस्तावित केल्यानुार वरीलप्रमाणे ३ ते ४ पर्याय तयार करुन त्यानुसार सविस्तर प्रस्ताव प्राधिकरणास सादर करण्यात यावा तसेच मा. सभापती वा सन्मा. सदस्यांपैकी एक ते दोन सदस्य हयाबाबत मा. अध्यक्ष/प्रा. हयांच्याशी चर्चा करतील.

-----------------oo-----------------

**बाब क्रमांक : ८५/३**

विषय- इ.क्र.४२-४६, कामाठीपूरा, १२वी गल्ली, ९३-९५, कामाठीपूरा, १३वी गल्ली, १८-२२, आर.एस.निमकर मार्ग, भूकर पाहणी क्र.१९५, भायखळा विभाग या इमारतींच्या संयुक्त पुनर्बांधणी योजनेस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

..............................

सदर प्रस्ताव पृ.क्र.४७ ते ६५ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) हयांनी असे प्रतिपादन केले की, वरील ३ इमारतींची संयुक्त पुनर्बांधणी योजना मंडळाने हाती घेतली असून हया योजनेच्या नकाशांना म.न.पा. ने दि. २३.११.२००१ रोजी मंजूरी दिली आहे. जून्या २८ निवासी + १० अनिवासी = ३८ गाळयांच्या जागी आपण एकूण ५९ निवासी + १० अनिवासी = ६९ गाळे नवीन इमारतीत प्रस्तावित केलेले आहेत. हया योजनेस एकूण रु. १,७६,२८,५७५/- इतका खर्च अपेक्षित असून त्यास मंडळाची प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे. मंडळाच्या प्रशासकीय मान्यतेनंतर भूसंपादन कार्यवाही चालू करण्यास मंजूरी देण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला जाईल.

उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) हयांनी तदनंतर असे निदर्शनास आणून दिले की, हया तिन्ही इमारतींमध्ये वेश्या व्यवसाय असल्याने इमारतीतील भाडेकरु/रहिवाशांची नावे वारंवार प्रयत्न करुनही उपलब्ण झालेली नाहीत. मात्र जून्या इमारतीतील गाळयांची संख्या व त्यांचे क्षेत्रफळ जागेवर तपासलेले आहे. हया परिस्थितीत उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) हयांनी असे प्रस्तावित केले की, सद्यः आपण हया योजनेस प्रशासकीय मंजूरी देऊन पुढील कार्यवाही करु. मात्र बांधकामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यापूर्वी वर्तमानपत्रातून निवेदन प्रसिध्द करुन हया इमारतीतील भाडेकरु/रहिवाशांना त्यांचे हक्क संबंधित कागदपत्रांसह मंडळाकडे सादर करण्यास विनंती करु. व गाळे वाटपापूर्वी भाडेकरु/रहिवाशी निश्चित करु. हया कामाठीपूरा भागात जवळजवळ अशा १०० इमारती आहेत ज्याठिकाणी भाडेकरु/रहिवाशी निश्चित करणे अवघड होऊन बसले आहे. ही धोरणात्मक बाब असून त्यावर निर्णय घेणे आवश्यक आहे. जोपर्यंत आपण अशा इमारती पाडत नाही तोपर्यंत त्यामधील भाडेकरु/रहिवाशी निश्चित करता येणार नाहीत.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे सूचविले की, हयाबाबत विधी सल्लागार/प्राधिकरण हयांचे अभिप्राय घेण्यात यावेत. तद्नुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) हयांनी असे प्रतिपादन केले की, विधी सल्लागार/प्राधिकरण हयांचे अभिप्राय घेण्यास काहीही हरकत नाही. हया प्रस्तावानुसार आपण भाडेकरु/रहिवाशी निश्चित करत नसून फक्त प्रशासकीय मान्यता प्रदान करावयाची आहे, जेणेकरुन भूसंपादनाचा प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर करता येईल.

मा. सभापती हयांनी तद्नंतर असे प्रतिपादन केले की, कायद्यामध्ये ज्या काही तरतूदी आहेत त्यांचे आपणांस पालन करावेच लागेल. ज्या ठिकाणी भाडेकरु/रहिवाशी कोण आहेत हेच आपणांस माहित नाही अशा ठिकाणी काय कार्यवाही करावी हयाचा धोरणात्मक निर्णय विधी सल्लागार हयांच्या अभिप्रायांनुसार घेता येईल. मंडळाने जर काही धोरणात्मक निर्णय घेतला तर तो कायद्यानुसार मान्य केला जाईल का? तसेच भविष्यात जर न्यायालयात मंडळाने निश्चीत केलेल्या धोरणांस आव्हान दिले गेले तर असे धोरण न्यायालयातर्फे मान्य केले जाईल का? हया सर्व बाबी तपासून व विधी सल्लागार/प्राधिकरण हयांचे अभिप्राय घेऊन नंतरच त्याबाबत धोरण निश्चित करणे संयुक्तिक होईल.

उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, इमारतीची पुनर्रचना होईपर्यंतच्या कालावधीत आपण भाडेकरु/रहिवाशी निश्चित करणार आहोत. तसेच म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ९३ (३) व (४) नुसार भूसंपादन कार्यवाहीच्या वेळी आपण वर्तमानपत्रात निवेदन देऊन सर्व संबंधित भाडेकरु/रहिवाशांस सुनावणीस पाचारण केले जाणार आहे त्यावेळीही भाडेकरु/रहिवाशी निश्चित करण्यास मदत होणार आहे. मात्र इमारतीची पुनर्रचना पूर्ण झाल्यानंतर गाळे वाटपापूर्वी भाडेकरु/रहिवाशी निश्चित केले जातील. काही इमारती तळ मजल्याच्या छतापर्यंत पाडल्या असल्याने पुनर्रचनेबाबतची इतर कार्यवाही थांबविणे संयुक्तिक नाही.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी तद्नंतर अशी विचारणा केली की, कामाठीपूरा ५ व्या गल्लीमध्ये एक इमारत पुनर्रचित करण्याबाबत श्री. ब्रम्हचारी पांडे हयांनी विनंती केली होती. हया पुनर्रचना योजनेमध्येही वरील अडचण आहे का? सद्यः हया योजनेची स्थिती काय आहे?

तद्नुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) हयांनी असे प्रतिपादन केले की, हया योजनेच्या पुनर्बांधणीच्या कामास ठेकेदार निश्चित केला असून लवकरच प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात होणार आहे. तद्नुषंगाने मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, श्री. ब्रम्हचारी पांडे हे एखाद्या कामाच्या मागे लागून ते पूर्ण करतातच व त्यांच्या अशा सद्गुणामुळे सदर काम लवकरात लवकर सुरु होऊन पूर्ण होईलच.

मा. सदस्य श्री. मोहन देसाई हयांनी तद्नंतर अशी विचारणा केली की, जर हया इमारतीतील भाडेकरु/रहिवाशी हयांचे नाव उपलब्ध नाही तर जागा खाली करण्याच्या सूचना कोणत्या भाडेकरु/रहिवाशांच्या नावे दिल्या आहेत. तद्नुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) हयांनी असे प्रतिपादन केले की, भाडेकरु/रहिवाशांची यादी आपल्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही व इमारतीतही कोण रहाते हयाची माहिती तेथे राहणा-या व्यक्ती देण्यास तयार नाहीत.

मा. सदस्य श्री. मोहन देसाई हयांनी तद्नंतर अशी विचारणा केली की, आपणाकडे जर भाडेकरु/रहिवाशांची माहिती उपलब्ध नाही तर इमारतीची पुनर्रचना झाल्यानंतर त्यातील गाळे कोणास वाटप

केले जाणार आहेत. तद्नुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) हयांनी असे प्रतिपादन केले की, गाळे वाटपापूर्वी भाडेकरु/रहिवाशी निश्चित केले जातील.

मुख्य अधिकारी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, मा. सभापती हयांनी उपस्थित केल्यानुसार भाडेकरु/रहिवाशी कोण आहेत हयाची तपासणी आपण दरम्यानच्या कालावधीत करणार आहोतच. आता जो प्रस्ताव सादर केला आहे त्यानुसार फक्त हया योजनेस प्रशासकीय मंजूरी प्रदान करावयाची आहे, त्यास काहीच हरकत नसावी. तसेच मा.सभापती हयांनी सुचविल्यानुसार दरम्यानच्या कालावधीत भाडेकरु/रहिवाशांच्या अनुपलब्धतेबाबत विधी सल्लागार/प्राधिकरण हयांचे घ्यावेत.

मा.सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रस्तावित केले की, विधी सल्लागार/प्राधिकरण हयांचे अभिप्राय घेण्याच्या अटीवर हया पुनर्बांधणी योजनेस प्रशासकीय मंजूरी प्रदान करावी. हयास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक : ८५/६५६**

इ.क्र.४२-४६, कामाठीपूरा, १२वी गल्ली, ९३-९५, कामाठीपूरा, १३वी गल्ली, १८-२२, आर.एस.निमकर मार्ग, भूकर पाहणी क्र.१९५, भायखळा विभाग या इमारतींच्या संयुक्त पुनर्बांधणी योजनेच्या रु. १,७६,२८,५७५/- रक्कमेस प्रशासकीय मंजूरी, भाडेकरु/रहिवाशी हयांच्या अनुपलब्धतेबाबत विधी सल्लागार/प्राधिकरण हयांचे अभिप्राय घेण्याच्या अटीवर, सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

----------------oo------------------

**बाब क्रमांक : ८५.४**

**विषय- नियंत्रण कक्षात प्राप्त झालेल्या संदेशाची माहिती कालावधी दि. २३.११.२००२ ते २७.११.२००२.**

------------

सदर माहिती पृ.क्र.६७ वर सादर करण्यात आली आहे.

सदर माहितीची सर्वानुमते नोंद घेण्यात आली.

-----------oOo----------

**दक्षिण परिमंडळ**

**बाब क्रमांक :८५.५ (अ)**

विषय- **दक्षिण परिमंडळातील मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.**

------------------------------

सदर प्रस्ताव पृ.क्र. ६९ ते ७१ वर सादर करण्यात आला आहे .

सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने प्रभारी उपमुख्य अभियंता (द.) हयांनी असे प्रतिपादन केले की, दरवर्षीप्रमाणे हया वर्षी दि. १.११.२००२ ते दि. ३१.१०.२००३ हया कालावधीसाठी दक्षिण परिमंडळातील

मोडकळीस आलेल्या इमारतीच्या धोकादायक भागास टेकू लावण्यासाठी करण्यात येणा-या खर्चाची विभागनिहाय अंदाजपत्रके तयार करण्यात आली असून त्यासाठी प्रशासकीय मंजूरी आवश्यक आहे. प्रस्तावात सादर केल्यानुसार हया कामाकरिता **ए** विभागासाठी रु.३.६० लक्ष, **बी** विभागासाठी रु.५.३२ लक्ष, **सी १-२** विभागासाठी रु.३.८१ लक्ष, **सी ३-४** विभागासाठी रु.३.८० लक्ष, **डी-१** विभागासाठी रु.५.१९ लक्ष व **डी-२** विभागासाठी रु.२.४९ लक्ष असा एकूण रु. २४.२१ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

सविस्तर चर्चेअंती दक्षिण परिमंडळातील मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ८५/६५७**

**दक्षिण परिमंडळातील मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास दि. १.११.२००२ ते दि. ३१.१०.२००३ हया कालावधीसाठी खालीलप्रमाणे प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.**

| **विभाग** | **मंजूर प्रशासकीय रक्कम (रु.लक्ष)** |
|---|---|
| अे | ३.६० |
| बी | ५.३२ |
| सी १-२ | ३.८१ |
| सी ३-४ | ३.८० |
| डी-१ | ५.१९ |
| डी-२ | २.४९ |
| **एकूण -** | **२४.२१** |

---------------oo---------------

**बाब क्रमांक : ८५.५ (ब)**

विषय- प्रशासकीय मंजूरीपेक्षा अधिक झालेल्या खर्चास मंजूरी प्रदान करणेबाबत.

इ.क्र.५२, सी, डी, खत्तर अली लेन, डी-१ विभाग

सदर प्रस्ताव पृ.क्र.७३ ते ७५ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने प्रभारी उपमुख्य अभियंता (द.) हयांनी असे प्रतिपादन केले की, हया दोन्ही इमारतींच्या कामांमध्ये वाढ झाल्याने दुरुस्तीसाठी झालेला प्रत्यक्ष खर्च हा प्रशासकीय मंजूरीपेक्षा अधिक झाला आहे. अंतिम देयक पारित करण्यासाठी सदर वाढीव खर्चास मंडळाची मंजूरी आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती विषयांकित इमारतीच्या दुरुस्तीसाठी प्रशासकीय मंजूरीपेक्षा अधिक झालेल्या खर्चास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ८५/६५८**

इ.क्र.५२, सी, डी, खत्तर अली लेन, डी-१ विभाग हया इमारतीच्या दुरुस्तीसाठी प्रशासकीय मंजूरीपेक्षा अधिक झालेल्या रु.१,१४,१९६/- इतक्या खर्चास सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

--------------oo----------------

**बाब क्रमांक : ८५.५ (क)**

विषय- इ.क्र.९१-९५, सैफी ज्युबीली स्ट्रीट, सी १-२ विभाग हया इमारतीच्या दुरुस्तीसाठी प्रदान केलेल्या प्रशासकीय मंजूरीची मुदत वाढविणबाबत.

--------------------

सदर प्रस्ताव पृ.क्र.७७ ते ७९ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने प्रभारी उपमुख्य अभियंता (द.) हयांनी असे प्रतिपादन केले की, विषयांकित इमारतीच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास मंडळाच्या दि. ९.१०.९५ रोजी झालेला बैठकीत प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली होती. परंतु रहिवाशांच्या विरोधामुळे ठेकेदार नियुक्त करुनही काम सुरु होऊ शकले नाही. शेवटी ठेकेदाराच्या विनंतीनुसार त्याला कार्यमुक्त करण्यात आले व तद्‌नंतर पुन्हा निविदा मागवून दुस-या ठेकेदाराची नियुक्ती केली. परंतु पुन्हा रहिवाशांच्या विरोधामुळे काम सुरु होऊ शकले नाही. आता इमारतीची अवस्था अत्यंत धोकादायक झाली असल्याने रहिवाशांनी त्वरित दुरुस्ती काम सुरु करण्याची विनंती केली आहे. नियुक्त केलेल्या ठेकेदाराने हे काम जून्या दराने करण्यास संमती दर्शविली आहे. परंतु प्रशासकीय मान्यतेची मुदत ही दि. ८.१०.२००० रोजी संपली असल्याने ती पुढील ५ वर्षांपर्यंत म्हणजे दि. ८.१०.२००५ पर्यंत वाढविणे आवश्यक आहे, जेणेकरुन हया इमारतीच्या दुरुस्ती कामास त्वरित सुरुवात करणे शक्य होईल.

सविस्तर चर्चेअंती प्रशासकीय मान्यतेची मुदत दि. ८.१०.२००५ पर्यंत वाढविण्यास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ८५/६५९**

इ.क्र.९१-९५, सैफी ज्युबीली स्ट्रीट, सी १-२ विभाग हया इमारतीच्या दुरुस्तीसाठी प्रदान केलेल्या प्रशासकीय मान्यतेची मुदत पुढील ५ वर्षांपर्यंत म्हणजेच दि. ८.१०.२००५ पर्यंत सर्वानुमते वाढवून देण्यात आली.

-----------oo--------------

**बाब क्रमांक : ८५.५ (ड)**

विषय- **दक्षिण परिमंडळातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशाकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.**

-----------------------------

सदर प्रस्ताव पृ.क्र. ८१ ते ९९ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने प्रभारी उपमुख्य अभियंता (द.) हयांनी असे प्रतिपादन केले की, दक्षिण परिमंडळातील **ए.** विभागातील २, **सी १-२** विभागातील १, **डी-१** विभागातील ३ व **डी-२** विभागातील २ अशा

एकूण ८ इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत.

मुख्य अधिकारी हयांनी पृ.क्र.९९ वर सादर केलेल्या इ.क्र.५८-६८, फोर्जेट स्ट्रीट हया इमारतीच्या दुरुस्तीच्या अनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीच्या रहिवाशांनी त्यांच्या इमारतीची दुरुस्ती प्रचलित पध्दतीप्रमाणे न करता ती काही रासायनिक पदार्थ वापरुन करण्याची विनंती केली आहे. प्रचलित प्रमाणित मर्यादेवरील जादा खर्च रहिवाशांना सोसावा लागणार आहे. त्यामुळे रहिवाशांना जर त्यांच्या पध्दतीनुसार दुरुस्ती करावयाची असल्यास त्यानुसार दुरुस्ती करावयास हरकत नसावी. हया मा. सभापती व सर्व सन्मा. सदस्यांनी सहमती दर्शविली.

सविस्तर चर्चेअंती दक्षिण परिमंडळातील ८ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ८४/६५२**

**दक्षिण परिमंडळातील एकूण ८ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या "परिशिष्ट-अ" प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.**

----------ooo-----------

**उत्तर परिमंडळ**

**बाब क्रमांक : ८५.६**

विषय- उत्तर परिमंडळातील जून्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ /सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशाकीय मंजूरी प्रदान करणेबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र. १०१ ते १९५ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, उत्तर परिमंडळातील ई विभागातील १२, फग/द विभागातील २, फग/ऊ विभागातील १७ अशा एकूण ३१ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत. हया अंदाजपत्रकांची एकूण रक्कम रु. २.५४ कोटी असून निव्वळ टप्प्यांची रक्कम रु. १.९९ कोटी आहे. रु. १०००/- प्रति चौ.मी. मर्यादेतील रक्कम रु. १.९७ कोटी असून रु.१०००/- प्रति चौ.मी. वरील जादा रक्कम रु. २.३२ लक्ष आहे जी ५ टक्क्यापेक्षाही कमी आहे.

सविस्तर चर्चेअंती उत्तर परिमंडळातील एकूण ३१ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ८५/६६१**

**उत्तर परिमंडळातील एकूण ३१ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मूळ / सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या " परिशिष्ट-ब " प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.**

-----------------oooo-----------------

**बाब क्रमांक : ८५.७**

**मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी ठेवावयाचे विषय**

---

विषय- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळांतर्गत पुनर्रचित करण्यात आलेल्या इमारतीतील रिक्त असलेल्या निवासी/अनिवासी गाळयांची खुल्या बाजारात विक्री करणेबाबत.

......................

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयामध्ये पटलावर सादर केलेला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सहमुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाने पुनर्रचित केलेल्या जवळजवळ ३० इमारतीतील ४८ अनिवासी व १०१ निवासी गाळे मागील ८-१० वर्षांपासून रिक्त आहेत. हे गाळे त्रिकोणी स्वरुपाचे किंवा त्यात अंधार असल्याने किंवा व्यावसायिकदृष्टया योग्य नसल्याने मूळ हक्कधारक किंवा बृहतसूचीवरील रहिवाशी स्विकारण्यास तयार नाहीत. तसेच आता आपण प्रचलित पध्दतीनुसार किमान २२५.०० चौ.फू. चटई क्षेत्रफळाचे गाळे वाटप करीत असल्याने वरील गाळे कोणीही स्विकारत नाहीत. त्यामुळे हे गाळे खुल्या बाजारात विक्री करण्यासाठी प्रस्तावित केले आहे.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी हयाबाबत अशी विचारणा केली की, खुल्या बाजारात आपण हे गाळे विकणार आहोत. म्हणजे त्यासाठी आपण वर्तमानपत्रातून जाहीरात वगैरे देणार आहोत का ? तसेच मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी असेही निदर्शनास आणले की, नमूद केल्यानुसार अशा गाळयांची यादी सादर केलेली दिसत नाही.

सहमुख्य अधिकारी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की,हया गाळयांच्या विक्रीसाठी वर्तमानपत्रांत जाहीरात प्रसिध्द केली जाईल तसेच अशा गाळयांची यादी अनावधनाने प्रस्तावासोबत न जोडल्याने सदर यादी सन्मा. सदस्यांना त्वरित पुरविण्यात येईल. हे गाळे एकूण २९ इमारतींमध्ये आहेत. हया गाळयांची खुल्या बाजारात विक्री केल्यास मंडळाला साधारणत: २ ते ३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होऊ शकेल. हया गाळयांची स्थिती अतिशय खराब असून त्यांच्या दुरुस्तीसाठी मंडळाने खर्च करण्यापेक्षा ते खुल्या बाजारात विकण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे हा प्रस्ताव मंडळाच्या मंजूरीसाठी सादर केला आहे.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी हयाबाबत अशी विचारणा केली की, मंडळाच्या विभागीय कार्यालयामध्ये कर्मचा-यांना बसण्यासाठीजागा नसल्याने असे गाळे आपण मंडळाच्या कार्यालयांसाठी वापरु शकत नाही का ? तद्नुषंगाने सहमुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, हे गाळे अतिशय अडगळीच्या ठिकाणी व आकाराने लहान असल्याने त्यांचा वापर मंडळाच्या कार्यालयांसाठी केला जाऊ शकत नाही.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तद्नुषंगाने अशी मागणी केली की, हया गाळयांची यादी, संबंधित विभागातील बाजारभावाचा दर हयासह हा प्रस्ताव मंडळापुढे फेर सादर करावा जेणेकरुन त्याबाबत विचार करुन निर्णय घेणे संयुक्तिक हाईल.

सहमुख्य अधिकारी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, पिंपळेश्वर इमारतीसाठी आपण रु. १५००/- प्रति चौ.फू. दर निश्चित केला असून, विभागवार जे दर आहेत त्यानुसार "क" विभागात रु. ३०४०/- प्रति चौ.फू. अनिवासी गाळयासाठी व रु. २०२५/- प्रति चौ.फू. निवासी गाळयासाठी, "ड" विभागात रु. १७३५/- प्रति चौ.फू. निवासी गाळयासाठी व रु. २६००/- प्रति चौ.फू. अनिवासी गाळयासाठी, "ई" विभागात रु. १३७५/- प्रति चौ.फू. निवासी गाळयासाठी व रु. २६००/- प्रति चौ.फू. अनिवासी गाळयासाठी तसेच "फ" विभागात रु. ११५५/- प्रति चौ.फू. निवासी गाळयासाठी व रु. १७३०/- प्रति चौ.फू. अनिवासी गाळयासाठी व "ग" विभागात रु. १३९०/- प्रति चौ.फू. निवासी गाळयासाठी व रु. २०८५/- प्रति चौ.फू. अनिवासी गाळयासाठी असे दर आहेत.

मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, हे जे दर आहेत ते संबंधित विभागातील सर्वसाधारण दर आहेत. परंतु जोपर्यंत अशा गाळयांची यादी प्राप्त होत नाही तोपर्यंत कोणत्या गाळयांसाठी किती दर आहे हे समजू शकणार नाही.

मा. सदस्य श्री. सचिन सावंत हयांनी तद्नंतर अशी विचारणा केली की, हया विषयावर मंडळाच्या मागील बैठकीतही चर्चा झालेली आहे. मंडळाच्या अधिकारामध्ये आपणा अशा गाळयांची विक्री करु शकतो का ?

मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, मुख्य अधिकारी हयांनी मागील बैठकीत सांगितल्यानुसार मंडळ अशा गाळयांची विक्री करु शकत नाही.

मुख्य अधिकारी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, अशा गाळयांची विक्री कायद्याने करु शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. परंतु हे गाळे वारंवार प्रयत्न करुनही कोणीही स्विकारण्यास तयार नसल्याने त्यांची विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. त्यामुळे आपणांस धोरण निश्चित करावे लागणार आहे व त्यासाठी सविस्तर प्रस्ताव प्राधिकरणास सादर करावा लागणार आहे. हे गाळे मागील ८-१० वर्षांपासून रिक्त असून ते स्विकारण्यास कोणीही तयार नाही. हया परिस्थितीत हे गाळे खुल्या बाजारात विकण्याशिवाय मंडळापुढे दुसरा पर्यायच शिल्लक राहीलेला नाही. हयापूर्वी हे गाळे विकण्याचा प्रयत्न केला होता. परंतु वाढीव दरामुळे हे गाळे कोणी घेण्यास तयार झालेले नाही.

मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाने आकारलेले दर हे वाजवी नसल्याने हे गाळे घेण्यास कोणीही तयार होत नाही. त्यामुळे दर वाजवी असावेत. हयासाठी अशा गाळयांची यादी प्रस्तावित दरांसह सादर केल्यास त्यावर चर्चा करुन आपण निर्णय घेऊ.

मुख्य अधिकारी हयांनी तद्नंतर असे प्रतिपादन केले की, मुंबई मंडळामध्ये सदनिकांच्या विक्रीसाठी एक तांत्रिक समिती गठीत केलेली आहे. जर काही ५-१० सदनिकांची विक्री झाली नाही तर त्यांच्या विक्रीचा दर हया तांत्रिक समितीमध्ये कमी करुन निश्चित केला जातो व त्या दरानुसार सदनिकांची विक्री मुंबई मंडळातर्फे केली जाते. जेणेकरुन हे ५-१० गाळे रिक्त राहून त्यापोटी विनाकारण मंडळास करापोटी आर्थिक भार सहन करावा लागू नये. अशाच प्रकारची तांत्रिक समिती दुरुस्ती व पुनर्रचना मंडळात गठीत करणे आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी तद्नंतर अशी विचारणा केली की, खरोखरच मंडळाचे ४८ अनिवासी व ११० निवासी गाळे रिकामे आहेत का ? तद्नुषंगाने मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई हयांनी असे प्रतिपादन केले की, अशा गाळयांना मंडळाने जरी कुलूपे लावली असती तर कुलूपे तोडून अशा गाळयांमध्ये घुसखोरी झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

सहमुख्य अधिकारी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया गाळयांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली असून त्यांनुसारच ही आकडेवारी सादर करण्यात आली आहे.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी तद्नंतर असे प्रतिपादन केले की, त्यांनी जेव्हा मंडळाच्या संक्रमण शिबीरातील रिक्त गाळयांची पाहणी केली होती तेव्हा त्यांना असे आढळून आले होते की, रिक्त गाळयांना जरी बाहेरुन कुलूप लावलेले दिसत असले तरी आतमध्ये रहिवाशी त्यांच्या सामानासह रहात होते. त्यामुळे अशा गाळयांमध्येही तशी परिस्थिती असू शकते.

मा. सदस्य श्री. मोहन देसाई हयांनी तद्नंतर अशी विचारणा केली की, प्रस्तावात नमूद केल्यानुसार काही गाळयांच्या बाबतीत न्यायालयामध्ये खटले प्रलंबित आहेत. हयाबाबतची नेमकी वस्तुस्थिती काय आहे ?

सहमुख्य अधिकारी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, हयापैकी काही गाळयांमध्ये घुसखोरी झाल्याने आपण त्यांना काढल्यानंतर त्यांनी न्यायालयात दावे दाखल केले आहेत. परंतु सद्यः हे सर्व गाळे रिक्त आहेत.

मा. सभापती हयांनी तद्नंतर असे प्रतिपादन केले की, हे गाळे वेडेवाकडे असल्याने वा मध्येच खांब असल्याने कोणी घेण्यास तयार नाही. त्यामुळे यापुढे इमारतींचे आराखडे तयार करताना अशा प्रकारच्या गाळयांची तरतूद नवीन इमारतील केली जाणार नाही हयाबाबत पुनर्रचना विभागाने नकाशे तयार करताना काळजी घ्यावयास हवी. आपण दुर्गादेवी म्हणून जी १०५ गाळयांची मोठी इमारत बांधली आहे त्या इमारतीमध्ये ये-जा करण्यासाठी एकच मार्ग आहे. त्यामुळे आणीबाणीच्या परिस्थितीत या मार्गाचा काहीच उपयोग होऊ शकत नाही. आपण जे १८०.०० चौ.फू. चटईक्षेत्रफळाचे गाळे बांधले आहेत ते सद्यः कोणी घेण्यास तयार नाहीत. कारण आताच्या धोरणांनुसार २२५.०० चौ.फू. चटईक्षेत्रफळाचे गाळे देणे बंधनकारक आहे. त्यामुळे आपण मागच्या वेळी असा निर्णय घेतला होता की, १८० चौ.फू. चटईक्षेत्रफळाचे गाळे एकत्र करुन २२५.०० चौ.फू. चटईक्षेत्रफळापेक्षा अधिक होणारे क्षेत्रफळ बाजारभावाप्रमाणे आम जनतेस किंवा बृहत्सूचीवरील रहिवाशांना विकावेत. हयाबाबत पुढे काय कार्यवाही झाली आहे ? अशी विचारणा मा. सभापती हयांनी केली. तद्नंतर मा. सभापती हयांनी असेही प्रतिपादन केले की, अतिरिक्त क्षेत्रफळ व अतिरिक्त गाळा हया दोन्हीमध्ये तफावत असली पाहिजे. रेडी रिकोनर नुसार प्रत्येक विभागातील वेगवेगळया ठिकाणांसाठी वेगवेगळे दर आहेत. अतिरिक्त क्षेत्रफळ व अतिरिक्त गाळयासाठी रेडी रिकोनरप्रमाणे एकच दर आकारणे चुकीचे आहे. अतिरिक्त क्षेत्रफळ हे आपण जबरदस्तीने एखाद्या रहिवाशास घेण्यास आपण भाग पाडत असल्याने त्यासाठी वेगळा दर आकारणे आवश्यक आहे. मात्र अतिरिक्त गाळयासाठी रेडी रिकोनरप्रमाणे दर आकारुन त्याची खुल्या बाजारात विक्री करण्यास हरकत नाही. हया दोन्हीबाबतचा प्रस्ताव मंडळापुढे सादर करण्याचे मागील बैठकीत ठरले होते. परंतु अद्याप त्याबाबत प्रस्ताव सादर केलेले नाहीत. त्यामुळे हे दोन्ही प्रस्ताव व सद्यः सादर केलेला प्रस्ताव महत्वाचे असल्याने एकत्रितपणे सादर केल्यास त्याबाबत लगेच निर्णय घेऊन कार्यवाही करता येईल.

पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधलेल्या इमारतीतील गाळेसुध्दा हया प्रस्तावात समाविष्ट करावेत. गेल्या ५-१० वर्षापासून हे मुदद् प्रलंबित असल्याने त्याबाबत शीघ्र कार्यवाही होणे आवश्यक आहे, जेणेकरुन मंडळाच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होईल.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्ताव वरील मुद्दे विचारात घेऊन फेर सादर करण्याचे सर्वानुमते ठरले.

२) विषय- मंबई शहरातील जून्या इमारतींच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत करावयाच्या दुरुस्ती कामाकरिता ८.५ टक्केप्रमाणे अभिकरण शुल्क आकारणेबाबत.

..............................

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयात पटलावर सादर करण्यात आला आहे.

हया प्रस्तावाच्या अनुषंगाने सचिव हयांनी असे प्रतिपादन केले की, हा प्रस्ताव दुरुस्ती कामांशी निगडीत आहे. काही उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीसाठी स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत आमदार निधी प्राप्त होतो. हयाबाबत जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा हयांनी असे कळविले आहे की, हया कामांसाठी अभिकरण शुल्क ४.०० टक्के आकारण्यात यावे व उर्वरित अभिकरण शुल्काचा खर्च मंडळाने करावा. हयाबाबतचे अभिप्राय त्यांनी मंडळाकडून मागविले आहेत. परंतु मंडळाच्या नियमांनुसार वास्तुशास्त्रज्ञ फी ही ६ टक्के असून २.५ टक्के आस्थापना खर्च असे एकूण ८.५ टक्के अभिरण शुल्क होते.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, अभिकरण शुल्कासाठी आपला खर्च जर ८.५ टक्के होतो तर तेवढाच खर्च अभिकरण शुल्कापोटी जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा हयांनी देणे आवश्यक आहे व त्यानुसार आपले अभिप्राय त्यांना कळवावेत.

हया प्रस्तावाच्या अनुषंगाने मुख्य अधिकारी हयांनी सर्व विभागीय कार्यकारी अभियंत्यांच्या असे निदर्शनास आणून दिले की, मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा हयांनी अर्धशासकीय पत्राव्दारे अशी विनंती केली आहे की, स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत मंडळाने केलेल्या कामांची उपयुक्तता प्रमाणपत्रे (Utilization Certificate) वारंवार मागवून त्यांना प्राप्त झालेली नाहीत. त्यामुळे जोपर्यंत "उपयुक्तता प्रमाणपत्रे" प्राप्त होणार नाहीत तोपर्यंत आमदार निधीची रक्कम मंडळाकडे सुपूर्द केली जाणार नाही. हयामुळे सदर कामांची उपयुक्तता प्रमाणपत्रे त्वरित जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा कार्यालयाकडे सादर करण्याचे आदेश मुख्य अधिकारी हयांनी सर्व विभागीय कार्यकारी अभियंत्यांना दिले. तसेच त्यांनी संबंधित उपमुख्य अभियंता यांना असे आदेश दिले की, उपयुक्तता प्रमाणपत्रे त्वरित जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा हयांना पाठविण्याबाबत दक्षता ध्यावी व ही जबाबदारी सर्वश्री त्यांची राहील. एकतर मंडळाकडे अपुरा निधी आहे व स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत मंडळास चांगल्या प्रमाणात निधी उपलब्ध होत असल्याने तो त्वरित होण्याच्या दृष्टीने सत्वर कार्यवाही होणे आवश्यक आहे.

तद्नंतर मुख्य अधिकारी हयांनी सचिव हयांना असेही आदेश दिले की, हयाबाबत त्यांनी पुढील आढावा बैठकीवेळी, कोणत्या विभागाने किती कामांची उपयुक्तता प्रमाणपत्रे मा. जिल्हाधिकारी हयांच्या कार्यालयाकडे पाठविणे प्रलंबित आहे हयाची माहिती संकलित करुन सादर करावी.

वरील सविस्तर चर्चेअंती स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत करावयाच्या दुरुस्ती कामांकरिता ८.५ टक्के प्रमाण अभिकरण शुल्काची रक्कम मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा हयांनी मंजूर करण्याबाबत त्यांना कळवावे असे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ८५/६६२**

स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत मंडळातर्फे केल्या जाणा-या उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीसाठी ८.५ टक्के अभिकरण शुल्काची रक्कम मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा हयांनी मंडळास द्यावी असे अभिप्राय मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा हयांना कळविण्याबाबत सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

------------oo------------

३) विषय- **मुंबई बेटावरील "अ" वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे प्रस्ताव.**

-----------------------

मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयामध्ये मुंबई बेटावरील "अ" वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे खालील ३ प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

१. भुकर पहाणी क्रं.१०५६, मांडवी विभाग, विभाग क्र. बी-१७२३ इ.क्र.१४-१६, खडक स्ट्रीट, मुंबई येथील " अश्रफी मंझील " नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

२. भुकर पहाणी क्र.८५/१० माटुंगा विभाग भूखंड क्र. ८४, दादर माटुंगा इस्टेट विभाग क्र. एफएन-७२४८ (२) इ.क्र. ६७, लखमशी नापू रोड, (८४, हिन्दू कॉलनी, रोड नं.२), दादर (पू) मुंबई येथील " नव लीला " म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

३. भूकर पाहणी क्र.१/५९ व २/५९, गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-९१, ९२, ९० (१-१ए) ९० (२) व ९५ (१) इ.क्र.२६०, एफ.आय.के. २६० एम्, २६० एल्, २६० एन् व २५२-२६८, जे.एस. एस. रोड, मुंबई येथील " गिरगाव एकता को.ऑप.हौ.सो.लि. " म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत. — विचाराधीन आहे.

उपरोक्त ३ प्रस्तावांबाबतची प्रस्तावनिहाय माहिती सचिवांनी सविस्तरपणे सभागृहास दिली. हया सविस्तर माहितीच्या अनुषंगाने प्रत्येक प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन मा. सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, हया सर्व प्रस्तावांमध्ये नियमाप्रमाणे ७० टक्के भाडेकरू / रहिवाश्यांची संमत्ती असून मालमत्ताधारक/

अनु क्र. ३ वरील गिरगाव एकता को.ऑप.हौ.सो.लि.च्या पुनर्विकासाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा. सभापती व सन्मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, हया पुनर्विकास योजनेत उपलब्ध होणारे अतिरिक्त क्षेत्रफळ विचारात घेता, ही पुनर्विकास योजना रहिवाशांना आर्थिकदृष्ट्या परवडेल किंवा नाही हयाबाबत साशंकता वाटते. त्यामुळे हयाबाबतचा सविस्तर खुलासा सदर को.ऑप.हौ.सो. कडून मागवून घ्यावा अशी शिफारस केली.

यावर मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाने हयाबाबत प्रस्ताव मंडळाच्या बैठकीसमोर ठेवण्याअगोदर सदर को.ऑप.हौ.सो. कडून खुलासा मागविला होता. सदर को.ऑप.हौ.सो.च्या वास्तुशास्त्रज्ञांनी दि. १०.१२.२००२ रोजी सादर केलेल्या खुलाशानुसार त्याना ही पुनर्विकास योजना आर्थिकदृष्टया राबविणे शक्यअसल्याचे त्यांनी कळविले आहे. त्यांनी पुढे असे सांगितले की, ही पुनर्विकास योजना सर्व रहिवाशांनी एकत्र येऊन राबविण्याचे ठरविले आहे. पुनर्विकास योजना आर्थिकदृष्टया परवडणारी नसेल तर ना.ह.प्र.पत्र न देण्याची तरतुद कायद्यात नाही. ना.ह.प्र.पत्र प्रदान केल्यानंतर जर हया को.ऑप.हौ.सो. ला पुनर्विकासाचे काम करणे शक्य झाले नाही तर त्याबाबत मंडळ पुढील अनुषंगिक कार्यवाही करेल.

वरील सविस्तर चर्चेअंती मुंबई बेटावरील "अ" वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी अ.क्र.१ ते ३ वर सादर केलेल्या प्रस्तावांना, प्रस्तावात नमुद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक: ८५/६६३**

मुंबई बेटावरील "अ" वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी मालमत्ताधारक /मुखत्यारपत्रधारक/विकासक हयांच्याकडून प्राप्त झालेल्या खालील ३ प्रस्तावांना प्रस्तावात नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१) भुकर पहाणी क्र.१०५६, मांडवी विभाग, विभाग क्र. बी-१७२३ इ.क्र.१४-१६, खडक स्ट्रीट, मुंबई येथील " अश्रफी मंझील " नावाने ओळखली जाणारी मालमत्ता.

२) भुकर पहाणी क्र.८५/१० माटुंगा विभाग भूखंड क्र. ८४, दादर माटूंगा इस्टेट विभाग क्र. एफएन-७२४८ (२) इ.क्र. ६७, लखमशी नापू रोड, (८४, हिन्दू कॉलनी, रोड नं.२), दादर (पू) मुंबई येथील " नव लीला " म्हणून ओळखली जाणारी मालमत्ता.

३) भूकर पाहणी क्र.१/५९ व २/५९, गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-९१, ९२, ९० (१-१ए) ९० (२) व ९५ (१) इ.क्र.२६०, एफ.आय.के. २६० एम्, २६० एल्, २६० एन् व २५२-२६८, जे.एस. एस. रोड, मुंबई येथील " गिरगाव एकता को.ऑप.हौ.सो.लि. " म्हणून ओळखली जाणारी मालमत्ता.

--------------oo-------------

तद्नंतर मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, आपण ज्या २७४ अरुंद भूखंडांवर पुनर्रचना योजना राबवू शकत नाही अशा अरुंद भूखंडाच्या शेजारील भूखंडांवर जर कोणी पुनर्विकास योजना हाती घेतली/घेणार असेल तर त्या योजनेमध्ये असे अरुंद भूखंड समाविष्ट करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. अशा भूखंडांवरील अस्तित्वात असलेल्या रहिवाशांचे पुनर्वसन संबंधित विकासकाने करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अशा भूखंडावरील रहिवाशांना मंडळाने जर इतर पुनर्रचित इमारतीत गाळे वाटप केले असेल तर अशा रहिवाशांसाठीचे गाळे विकासकाने त्याच्या योजनेतून मंडळास देणे आवश्यक आहे. असे गाळे आपण बृहतद्यसूचीवरील इतर रहिवाशांना देऊ शकतो. मुख्य अधिकारी हयांनी त्यादृष्टीने उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) हयांना प्रत्येक विभागामध्ये असे दोन प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले.

बैठकीच्या शेवटी मुख्य अधिकारी हयांनी मंडळाचे जे अधिकारी नुकतेच बदलून इतर मंडळांमध्ये गेले आहेत त्यांनी मंडळास केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानले व त्यांना त्यांच्या जागेवरील कामास शुभेच्छा दिल्या. तसेच त्यांनी असेही प्रतिपादन केले की, मुंबई मंडळाप्रमाणे आपल्या मंडळात सचिव हे पद नसताना श्री. सावंत हयांनी त्या पदावर अतिशय उत्कृष्ट काम केले. त्यामुळे मुख्य अधिकारी हयांनी त्यांचेही आभार मानले.

तद्नंतर मा. सभापती हयांनीही मंडळातून बदलून गेलेल्या अधिकारी/कर्मचारीवर्गास त्यांच्या नवीन जागेवरील कामास शुभेच्छा दिल्या व त्यांनी मंडळास चांगल्याप्रकारे सहकार्य केल्याबद्दल त्यांचे आभार मानले. तसेच श्री. सावंत, सचिव हयांचीही बदली मंडळातून झाल्याने त्यानाही त्यांच्या नवीन जागेवरील कामास शुभेच्छा देऊन त्यांनी आतापर्यंत जे मंडळास सहकार्य केले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

तसेच मा. सभापती हयांनी जे अधिकारी/कर्मचारी मंडळामध्ये नव्याने नियुक्त झाले आहेत त्यांचे स्वागत केले व ते मंडळास निश्चितच सहकार्य करतील अशी अपेक्षा करुन मंडळामार्फत त्यांनाही सहकार्य केले जाईल असे प्रतिपादन केले.

बैठकीच्या अखेरीस मा. सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, सन २००१ ते २००२ हया वर्षात प्रत्येक महिन्यात आपण एक बैठक घेतली असून त्यामध्ये ब-याच प्रकरणांवर विचार करुन आपण निर्णय घेतले आहेत. हयाबाबत त्यांनी सन्मा सदस्य, सर्व अधिकारी व कर्मचारीवर्गाचे आभार मानून आजची बैठक संपल्याचे जाहीर केले तसेच मंडळाची पुढील बैठक मंगळवार दि. ४ फेब्रुवारी २००३ रोजी दुपारी ३.०० वाजता घेण्यात येईल असे जाहीर केले.

नि.का.अ./ मुं.इ.दु. व पु.मंडळ

मुख्य अधिकारी / मुं.इ.दु. व पु.मंडळ

मा. सभापती/ मुं.इ.दु. व पु.मंडळ